भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०३/२०१७

१) मंदीरातील मंडपाचा रेलींगचा ताला तोडुन साहीत्याची चोरी . :–

दिनांक ०४/०३/२०१७ चे ०९.३० ते ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी गुलाब शिवाजी तिजारे वय ६२ वर्ष रा. लावेश्वर येथील हनुमान मंदीराचा पुजारी असुन कोणीतरी अज्ञात चोराने हनुमान मंदीरातील मंडपाचा रेलींगचा ताला तोडुन मंडपात प्रवेश करुन मंडपातील ३ पितळी घंटा किंमती अंदाजे ३९००/–रु. व दान पेटीची कडी कोंडा तोडुन दान पेटीतील अंदाजे २,०००/–रु. तांब्याची झारी, तांब्याचे पानदान किंमती अंदाजे २००/–रु. पितळी समई किंमती ३५०/–रु. असा एकुण ६,७५०/–रु. चा माल चोरुन केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कांरडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

२) रागाच्या भरात गाईच्या गोठयाला आग लावुन गाय जळाली व गोठा व तनसाची नुकसान केली . :–

दिनांक ०४/०३/२०१७ चे ०१.०० वा. दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी यांच्यात तोंडा तोडी भांडण झाल्याने आरोपीने रागाचे भरात फिर्यादीचे घरा लगत असलेला तनस व जनावरांच्या गाईच्या गोठयाला पेटवुन त्यात बांधलेली १ गाय पांढऱ्या रंगाची गाय जळुन मरण पावली गोठा व तनस असा एकुण किंमती १०,०००/–रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी विलास सखाराम प्रधान वय ३० वर्ष रा. लाखांदुर प्लॉट यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४३५,४२९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तलमले पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०२/०३/२०१७ चे १४.०० ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही शेळया चारण्यास तलावा जवळ गेली व शेळया चारुन सायकांळी घरी परत आली तेव्हा नातीन वय १७ वर्ष, ५ महीने ही घरी न दिसल्याने तीचा घरा शेजारी गावात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीची अल्पवयीन नातीन हीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) गैरकायदयाची मंडळी जमवुन दुकानाची खोली खाली करण्याच्या कारणावरुन काठीने मारपीट केली . :–

दिनांक ०४/०३/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे ज्वेलर्स दुकान भाडयाने असुन खोली रिकामी करण्याचे कारणा वरुन वाद असुन फिर्यादी ही आपले नौकरा सोबत दुकान उघडण्यास गेली असता तीला आरोपी क्र. १ व इतर यांनी मनाई केली म्हणुन ती घरा कडे जात असतांना आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन हातात काठया घेवुन फिर्यादीचे नौकरास मारपीट केले व त्यास रस्त्यात अडवुन बांधुन ठेवले असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १४७,१४८,१४९,३२३,३४१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

५) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०४/०२/२०१७ चे १४.०० ते १४.३० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा सुमो क्र. एमएच २० एवाय ८९१३ चा चालकान आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक ०४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, करडी, साकोली व अडयाळ येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३३ लिटर हातभटटी दारु किंमती २,४००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.